# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी
## ता. राहाता, जि.अहमदनगर
## निरूपयोगी भंगार साहित्याच्या जाहीर लिलावाच्या अटी व शर्ती

गुरुवार दि.०९/०१/२०२५ रोजी संस्थानचे श्री साईआश्रम भक्तनिवास परिसरातील पारायण मंडपात संस्थानचे विविध विभागांकडील निरूपयोगी डेडस्टॉक भंगार साहित्याची मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, महोदय तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी व सर्व प्रशासकिय अधिका-यांचे उपस्थितीत जाहीर लिलावाने विक्री करावयाची आहे. सदरील जाहीर लिलावाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे-

१) निरूपयोगी भंगार साहित्याचे जाहीर लिलावात भाग घेवू इच्छिणा-या व्यक्तींना लिलावाचे एक दिवस अगोदर अनामत रक्कम रू.५०,०००/- (अक्षरी पन्नास हजार मात्र) संस्थानचे लेखाशाखेत रोखीने भरावी लागेल. लिलावाचे दिवशी अनामत रक्कम भरता येणार नाही. तसेच अनामत रक्कम भरलेखेरीज लिलावात भाग घेता येणार नाही व बोली बोलता येणार नाही.

२) लिलावाचे वेळी अनामत रक्कम भरणा-या व्यक्तीस संस्थानतर्फे विशिष्ट क्रमांकाचे टोकन नंबर देण्यात येईल. त्याच व्यक्तीने जाहीर लिलावात बोली बोलावयाची आहे. लिलाव अनामत रक्कम भरलेल्या व्यक्तीने लिलावात किमान एक तरी बोली बोलणे बंधनकारक आहे. एकही बोली न बोलल्यास भरलेली अनामत रक्कम परत करता येणार नाही. अनामत रक्कम पावती इतर व्यक्तीचे ताब्यात दिल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी मुळ पावतीधारकांची राहील. त्याचदिवशी लिलाव पुर्ण झालेनंतर ज्या लिलावधारकांना लिलाव लॉट मिळाला नाही त्यांची अनामत रक्कम परत केली जाईल.

३) लिलावातील साहित्याचे लॉट तयार करून प्रत्येक लॉटचा लिलाव स्वतंत्र करण्यात येईल. अथवा परिस्थीतीनुरुप मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महोदय यांचे परवानगीने एकत्रित करण्यात येईल.

४) जाहीर लिलावातील निरोपयोगी भंगार साहित्याचे लॉट तयार करून त्यातील साहित्याची '**जेथे आहे, जसे आहे**' त्या स्थितीत विक्री करावयाची आहे. अती जड, साहित्य हलवणे शक्य नसलेले साहित्य संबधित विभागात पाहवयास मिळेल व सदर साहित्य त्याच ठिकाणावरुन ताब्यात मिळेल. लिलावधारकाने साहित्य आहे त्या स्थितीत स्वखर्चाने न्यावयाचे आहे. संबधित विभागाने मंजुरीप्रमाणे लॉट मधील साहित्य मोजुन प्रत्यक्ष लिलावधाकाच्या ताब्यात द्यावयाचे आहे, याबाबत वस्तु/साहित्य कमी-जास्त असलेबाबत पुन्हा तक्रार करता येणार नाही.

५) लिलावात बोली चालू असतांना निरोपयोगी भंगार साहित्याचे लॉटची तीनवार सर्वात जास्त बोलीची किंमत संस्थानला मान्य असल्यास शेवटची बोली बोलणा-याचे नांव मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, महोदय यांचे मान्यतेने तीनवार बोली लिलाव पध्दतीने पुकारून त्यावेळी पुर्ण केला जाईल. लॉटची किंमत योग्य आली नाही, असे दिसून आल्यास सदरील लॉटचा लिलाव स्थगित करण्यात येईल, याबाबतचा संपूर्ण अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, महोदय यांना राहील. त्याबाबत कारणे देणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.

६) ज्या लॉटचा तीनवार बोलीने लिलाव मंजूर होईल, त्या लिलावधारकाने तीनवार बोली रक्कमेच्या २५ टक्के रक्कम एक तासाचे आत संस्थानला जमा करावयाची आहे. उर्वरीत रक्कम लिलाव तारखेपासून जास्तीत जास्त ०७ दिवसाचे आंत भरून आपले रक्कम भरलेची पावती संबधित विभागास दाखवुन साहित्य ताब्यात घ्यावयाचे आहे.

७) लिलावधारकाने आपणांस मंजूर झालेल्या लॉटमधील साहित्य ताब्यात घेणेपुर्वी साफ/सफाई करणे, त्यातील घाण काढणे, तसेच लॉटमध्ये काही अडचणी असल्यास त्याबाबत पुर्वकल्पना संबधित विभागाचे अधिक्षक/विभागप्रमुख यांना द्यावी. तसेच माल ताब्यात घेतेवेळी/काम करत असतांना लिलावधारकांकडील कामगारांस काही दुखापत/इजा झाल्यास, त्यासाठी येणा-या खर्चाची व इतर सर्वस्व जबाबदारी संबंधित लिलावधारकाची राहील. यास संस्थान जबाबदार राहणार नाही, याची सर्व लिलावधारकांनी नोंद घ्यावी.

२..

८) ज्या व्यक्ती अगर संस्था यांचे नांवे लिलावातील साहित्यांची तीनवार बोली मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचे मान्यतेने पुर्ण झालेली आहे, त्यांनी तीनवार बोलीची संपूर्ण रक्कम रोखीने अथवा NEFT/RTGS द्वारे संस्थान खात्यात जमा होईल त्यानंतरच सबंधीत विभागामार्फत साहित्य/वस्तु लिलावधारकाचे ताब्यात देण्यात येईल. बोलीच्या रकमेमध्ये जीएसटी समावेश असेल. संस्थान अंतिम बोलीधारकाला बील देतांना अंतिम बोलीची रक्कम जीएसटीसह असल्याने जीएसटी दर्शवुन बील देईल.

९) जाहीर लिलावात भाग घेतलेल्या व्यक्तीने तीन वार बोलीने विहीत मुदतीत रक्कम भरून आपले मंजूर लॉटमधील साहित्य ताब्यात न घेतल्यास संबधितांनी जाहीर लिलावापोटी जमा केलेली अनामत रक्कम तसेच २५ टक्के रक्कम संस्थानखाती जप्त केली जाईल. अशा लॉटमधील साहित्याची विल्हेवाट लावण्याचे अधिकार संस्थानला राहतील, याबाबत आपणांस कुठलीही तक्रार करता येणार नाही.

१०) भंगार साहित्याचे लॉटचा जाहीर लिलाव पुर्ण झालेनंतर त्याची संपुर्ण रक्कम लिलावधारकाने संस्थानला जमा करावयाची आहे व सदरील लॉटमधील साहित्य आपले ताब्यात घ्यावयाचे आहे. तीनवार बोलीनंतर २४ तासाचे आत लिलावधारकाने साहित्य ताब्यात न घेतल्यास त्यानंतरच्या होणा-या नुकसानीस संस्थान जबाबदार राहणार नाही. अन्यथा त्याचे संरक्षणाची अगर ऊन, वारा,पाऊस अशा नैसर्गिक आपत्तीमुळे काही नुकसान झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी लिलावधारकाची राहील.

११) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीचे अधिकारी/कर्मचारी यांना सदरच्या जाहीर लिलावात भाग घेता येणार नाही.

१२) जाहीर लिलावाच्या अटी व शर्ती यामध्ये काही फेरबदल करण्याचे सर्व अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी राखून ठेवलेले आहे. त्यावर कोणतेही कारणे देणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.

१३) जाहीर लिलावामध्ये काही अपरिहार्य कारणास्तव वाद निर्माण झाल्यास सदर बाबतचे कामकाज राहाता ~~व कोपरगाव~~ कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.

१४) वरील अटी व शर्तीचे सर्व लिलावधारकांनी काटेकोरपणे पालन करावयाचे आहे, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

16/12/2024

(बाळासाहेब कोळेकर)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

OC